राष्ट्रीय आरोग्य अभियान
कंत्राटी पद भरती जाहिरात

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक येथील खालील कंत्राटी पदांकरीता नियुक्ती प्रक्रीया राबविण्यात येत आहे. खालील पदावर कंत्राटी तत्वावर कार्य करण्यास इच्छुक व पात्र असलेल्या उमेवारांनी **मा. अध्यक्ष तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचे नावे विहित नमुन्यातील पुर्ण भरलेला अर्ज प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक** या पत्यावर दिनांक 9C /92 / २०१७ सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

कंत्राटी पध्दतीवर भरावयाचा पदाचा तपशिल खालील प्रमाणे

पदाचे नांव	नेमणुकीचे ठिकाण	वय	शैक्षणिक अर्हता	जात प्रवर्ग / पदसंख्या	एकत्रित मानधन
साथरोग शास्त्रज्ञ	**आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक**	खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष तसेच (६५ वर्षा पेक्षा जास्त वय नसणारे आरोग्य विभागातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी ही अर्ज करु शकतात.)	एम.डी.पी.एस.एम./डी.पी.एच.अर्हताधारक आवश्यक आहे. तसेच प्रशिक्षणातील अनुभवी उमेदवारास प्राधान्य (आरोग्य विभागात किमांन २ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव असल्यास प्राधान्य)	**खुला-१**	२५०००/ -
वैद्यकिय अधिकारी	**तालुका प्रशिक्षण केंद्र,धडगाव जि.नंदुरबार**	खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष तसेच (६५ वर्षा पेक्षा जास्त वय नसणारे आरोग्य विभागातील सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी ही अर्ज करु शकतात.)	एमबीबीएस / बीएएमएस एमबीबीएस उमेदवार उपलब्ध न झाल्यास बीएएमएस उमेदवाराचा विचार करण्यात येईल. (आरोग्य विभागात किमांन २ वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव असल्यास प्राधान्य)	**खुला-१**	१५०००/ -

नेमणुकीच्या अटी व शर्ती -

१. इच्छुक उमेदवारानी विहीत नमुन्यातील परिपूर्ण भरलेला अर्ज १) संपूर्ण नांव २) मूळ रहिवाशी पत्ता ३) सध्याचा रहिवाशी पत्ता ४) जन्म दिनांक ५) जात व जातीचा प्रवर्ग ६) शैक्षणिक अर्हता ७) पदविका / पदवी / पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या अंतीम परिक्षेत मिळालेल्या गुणांची टक्केवारी ७) एमएससीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र ८) पदाशी संबधीत अनुभव प्रमाणपत्र ९) अर्जाच्या उजव्या व वरच्या कोपऱ्यात स्वतःचा फोटो १०) उमेदवारांची स्वाक्षरी,मोबाईल नं./ई मेल आय.डी.ई. माहितीचा टंकलिखित / संगणकीकृत अर्ज सादर करावा.

२. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, अनुभव प्रमाणपत्र इत्यादी साक्षांकित सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

३ विनंती अर्ज दिनांक 9C/ १२ / २०१७ रोजी साय.५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्या नंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाबाबत कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. टपाल विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४. मुलाखतीचा दिनांक, वेळ व स्थळ उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. व उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५. मुलाखतीस येतांना तपासणीसाठी मुळ कागदपत्रे सोबत आणावीत

६. मुलाखत कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार समितीने राखून ठेवलेले आहे.

७. सदर पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अत्यंत तात्पुत्या स्वरुपात व ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत अथवा करार कालावधी संपुष्टात येईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंतच राहील.

८. सदर पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मासिक मानधन तत्वावर भरण्यात येणार असल्याने यासंबंधीचे सेवाविषयक सर्व अधिकार मा.आयुक्त कुटूंब कल्याण,तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांना राहतील.

९. सदर पदे ही कंत्राटी तत्वावर भरण्यात येत असल्याने पदावर नियुक्त कर्मचाऱ्यास शासकीय कर्मचाऱ्याला देण्यात येणारे कुठलेली फायदे अनुज्ञेय नसतील.

१०. या सेवा करार पध्दतीच्या असल्याने उमेदवारास कायम स्वरुपी नियुक्तीचा अधिकार राहणार नाही.

११. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची कंत्राटी पदावर नियुक्ती दिल्यास मानधन निश्चित करतांना फरकाची रक्कम व प्रकल्प अंमलबजावणी आराखडयातील पदनिहाय मंजुर मानधनाची रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती देय राहील.

१२. असा सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी शारिरीक व मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.तसेच प्रस्तावीत सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

१३. असे अधिकारी / कर्मचाऱ्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालु किंवा प्रस्तावीत नसावी.

१४. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी असे अधिकारी / कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१५. असा अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाढण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१६. अशा अधिकारी / कर्मचारी यांनी (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

१७. अशा अधिकारी / कर्मचारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील

१८. अशा करार पध्दतीवरील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे माहीती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

१९. नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवुन कामाचे मुल्यमापन करतील.

२०. सदर पदासाठी नियुक्त उमेदवार त्या संबंधित उपक्रमासाठी जबाबदार राहील.

२१. या पदाची सेवा नियमित पदे नियुक्त झाल्यावर आपोआप समाप्त होईल.

२२. योजनानिहाय आढावा घेवुन आवश्यकतेनुसार कर्मचाऱ्यांना एका योजनेतुन दुसऱ्या योजनेसाठी तसेच एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात येईल

सहीने/-

सदस्य सचिव तथा प्राचार्य,
आरोग्य व कुंटुंब कल्याण प्रशिक्षण ,
केंद्र,नाशिक

सहीने/-

अध्यक्ष तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, नाशिक मंडळ,
नाशिक

राष्ट्रीय आरोग्य अभियान
कंत्राटी कर्मचारी नेमणे अर्जाचा नमुना

प्रति,
मा.अध्यक्ष
तथा उपसंचालक आरोग्यसेवा
नाशिक मंडळ,नाशिक

पासपोर्ट
फोटो

विषय - तालुका प्रशिक्षण केंद्र.धडगांव जि.नंदुरबार येथील.कंत्राटी वैद्यकिय अधिकारी/ आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक येथील कंत्राटी साथरोग शास्त्रज्ञ पदासाठी अर्ज.....

संदर्भ - आपल्या कार्यालयाची जाहीरात दैनिक ———— दि. / / २०१७

महोदय,

विनंती पूर्वक अर्ज सादर करण्यात येते की,वरिल पदाकरिता आपल्या वरिल संदर्भीय जाहीरातीनुसार अर्ज सादर करित आहे. अर्ज स्विकृती होणेस विनंती..

१) अर्जदाराचे पूर्ण नाव - ————————————————————

(आडनाव) (स्वतःचे नाव) (वडीलांचे / पतीचे नाव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता - ————————————————————

————————————————————

पिनकोड ———————— संपर्क दुरध्वनी क्रमांक ————————

३) जन्मदिनांक - / / अर्ज करण्याच्या दिनांकास वय —— वर्षे —— महिने ——

४) जात व जातीचा प्रवर्ग -

५) शैक्षिणिक पात्रता -

अ.क्र.	उत्तीर्ण परिक्षा	मंडळाचे/ विद्यापीठाचे नाव	मुख्य विषय	एकुण मिळालेले गुण	टक्केवारी	पास झाल्याचे वर्ष
१						
२						
३						
४						
५						

६) पूर्वानुभवः-

अ.क्र.	धारण केलेले पद	काम केलेल्या कार्यालयाचे नाव	कालावधी				कामाचे स्वरुप
			पासून	पर्यंत	वर्ष	महिने	

७) संगणका विषयी ज्ञान असल्यास माहितीः————————————————————

८) वरिल पदाकरिता इतर काही माहिती असल्यास -

————————————————————

मी प्रतिज्ञापूर्वक असे लिहून देतो/देते की,वर नमूद केलेली माहिती खरी आहे.ती कोणत्याही प्रकारे खोटी आढळल्यास माझा अर्ज नाकारण्याचा अगर नेमणूक रद्द करण्याचा अधिकार आपणास राहील.

ठिकाण -

दिनांक - / /२०१७

स्वाक्षरी
नाव ————————

सोबत जोडलेली कागदपत्रे - १) —— २) —— ३) —— ४) ——

५) —— ६) —— ७) —— ८) ——